**मराठी विज्ञान परिषद**

पत्ता : विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई ४०००२२ इमेल : office@mavipa.org

भ्रमणध्वनी क्र.: ९९६९१००९६१ (कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० मंगळवार साप्ताहिक सुट्टी)

**अधिक माहितीसाठी www.mavipa.org या वेबसाइटला भेट द्या.**

## विज्ञान परीक्षा (मराठी व इंग्रजी माध्यम)

मुलांनो, विज्ञानाचा वापर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या सर्वांच्या घरोघरी तर पोहोचलाच आहे. मोबाइल फोन- स्मार्ट फोन, लॅपटॉप, कम्प्यूटर, टॅब्लेट, ३-डी गेम्स, स्मार्ट वॉच इत्यादीमधील सर्व किंवा काहींचा वापर तर तुम्ही केलाही असेल. ही क्षेत्रे प्रगत होत आहेत, ती पुढे कुठे जाऊन पोहोचतील याचा अंदाज आपल्याला करता येणार नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा वेळी आपला विज्ञान विषय कच्चा असून चालणार आहे का ? त्यामुळे विज्ञानाशी मैत्री करणे गरजेचे आहे. अशी मैत्री करताना मनोरंजक माहितीतून, प्रयोग करता-करता असेल तर काय मज्जा येईल ना? आणि हे खरचं, शक्य आहे आणि सोप्पेही आहे. पोस्टाद्वारे विज्ञान परीक्षा हा उपक्रम मराठी विज्ञान परिषदेतर्फे १९९८सालापासून चालू आहेत. या परीक्षा सातवी, आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी व प्रौढांसाठीही आहेत. तुम्ही शालेय परीक्षांशिवाय संस्कृत, गणित, हिंदी, चित्रकला या विषयांच्या परीक्षा देतां ना, अगदी तशाच. अर्थात या विज्ञानाच्या परीक्षा असल्याने यात फरक तर यात असणारच ना! आपल्याला काय करायचे आहे, याची कल्पना पुढे वाचल्यावर येईलच.

विज्ञान परीक्षा सातवीसाठी प्रथमा, आठवीसाठी द्वितीया, नववीसाठी तृतीया अशा आहेत. आणि त्यापेक्षा वरच्या इयत्तातील मुलामुलींनाही वा प्रौढांना या परीक्षांना बसता येईल. जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत आमच्याकडून २० ते ४० पानांच्या छापील मजकुराची पुस्तिका आपल्याला पोस्टाने घरपोच मिळेल. यात सातवी व आठवीच्या मुलांना गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या नेहमीच्या विषयांबरोबर दैनंदिन जीवनातील विज्ञान, विज्ञान समस्या, विज्ञान गोष्टी, पुस्तक परीक्षण, घरच्याघरी करण्याजोगे प्रयोग, छोटे प्रकल्प यांसारख्या अनेक विषयांचा यात समावेश आहे. यातले हे वेगळेपण तुम्हाला आनंद देईल, नेहमीपेक्षा वेगळा अनुभव देईल याची खात्री वाटते. हा मजकूर शाळेच्या पाठ्यपुस्तकातील नक्कीच नाही. पण सातवी, आठवी, नववीच्या मुलांना झेपेल असा, विज्ञानाविषयी आवड वाढवणारा, थोडा आपल्या भारतीयांनी जुन्या काळात कोणते शोध लावले याची माहिती देणारा व अशा अनेक विषयांना समाविष्ट करणारा अभ्यासक्रम यात आहे.

पुस्तिकांबरोबर प्रश्नपत्रिका असणार आहेत. तुम्हांला मिळालेल्या पुस्तिकेतील तुमचा अभ्यास पूर्ण झाल्यावर पुस्तिकांसोबत पाठवलेल्या उत्तरपत्रिकेत दिलेल्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे तुम्ही लिहून आम्हांला पाठवायची आहेत. पुस्तकांत पाहून उत्तरे लिहिलेली आम्हांला चालणार आहे. म्हणजे ही परीक्षा नेहमीच्या परीक्षेसारखी नाही हे तुम्हाला पटेल, कदाचित आवडेलही. या पुस्तकांतील मजकुराचा अभ्यास तुम्ही केलात एवढे समाधान तुम्हांला व आम्हांला पुरे आहे! तुम्हांला करायला दिलेले प्रयोग करून पाहा. त्यांचे निष्कर्ष आम्हांला कळवा. येथे कोण पहिल्यांदा यशस्वी झाला आहे? अगदी नोबेल पारितोषिक विजेत्यांनीही चुका केल्या आहेत, मग आपला प्रयोग फसला हे कळवायला आपण घाबरायचे कशाला? तेही कळवा. आपण म्हणतो ना चुकतो तो शिकतो. पण तुम्ही प्रयोग केलाच नाही तर तुम्ही चुकणारही नाही आणि शिकणारही नाही. तसे होऊ देऊ नका. तुम्ही केलेले हे प्रकल्प आम्हांला लिहून कळवायचे आहेत. प्रकल्प, प्रयोग आणि समस्यापूर्तीचा भाग तुम्हांला करावाच लागेल. तो भाग तर या परीक्षांचा प्राण आहे. तो सोडवला नाही तर तुम्ही ही परीक्षा दिलीच नाहीत असे समजले जाईल. परिणामी या परीक्षेच्या फलश्रुतीला तुम्ही मुकाल, तुम्हाला प्रमाणपत्र मिळणार नाही. उत्तरपत्रिकेत तुम्हांला प्रत्येक प्रश्नात किती गुण मिळाले, तुम्ही कोठे चुकलात, या शेऱ्यांसह तुमच्या उत्तरपत्रिका तुम्हांला परत मिळतील. सर्व उत्तरपत्रिका गुणपत्रकासह मे महिन्यात मिळतील. त्याच वेळी जे कमीतकमी ४० टक्के गुण मिळवून परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांनाच प्रमाणपत्र मिळेल. शिवाय, महाराष्ट्रातील प्रत्येक इयत्तेच्या गुणानुक्रमे पहिल्या तीन मुला-मुलींना पुढीलप्रमाणे बक्षिसे मिळतील : पहिले पारितोषिक रु.१,०००/-, दुसरे पारितोषिक रु.८००/-, तिसरे पारितोषिक रु.६००/-. सर्व विजेत्यांना बक्षिसांची निम्मी रक्कम रोख व निम्म्या रकमेची पुस्तके मिळतील. मात्र, बक्षिसे फक्त सातवी, आठवी आणि नववी इयत्तेतील प्रत्यक्ष मुलांनाच मिळतील. प्रौढांना बक्षिसे मिळणार नाहीत.

**आमच्याकडून अभ्यासक्रम पुस्तिका तुम्हांला पोस्टाने मिळण्याची तारीख : ३१ ऑगस्ट**

**तुम्ही सोडवलेल्या उत्तरपत्रिका पोस्टाने आम्हांला पाठवायची शेवटची तारीख : ३० नोव्हेंबर**

**टीप : फक्त उत्तरपत्रिका पाठवावी. संपूर्ण पुस्तिका पाठवू नका.**

**मराठी माध्यमासाठी परीक्षा शुल्क :** प्रथमा (सातवी) - रु.२२५/-, द्वितीया (आठवी) - रु.२५०/- आणि तृतीया (नववी) रु.२७५/- परीक्षा शुल्क मनिऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्ट अथवा ऑनलाइन भरावे. त्यासाठी बँकेचा तपशील खाली दिला आहे. (मुंबईतील मुलांनी चेक पाठवावा अथवा रोख रक्कम भरली तरी चालेल) **मराठी विज्ञान परिषद** या नावाने विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव- चुनाभट्टी, मुंबई ४०००२२ या पत्त्यावर पाठवावे. शुल्क पाठवताना सोबत विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव, घरचा पिनकोडसहित संपूर्ण पत्ता, मोबाइल क्र., घरचा दूरध्वनी क्र., असल्यास इ-मेल पत्ता आणि शाळेचे नाव व संपूर्ण पत्ता कळविणे आवश्यक आहे. प्रौढांनी शाळेचे नाव वगळून आणि स्वतः प्रौढ असल्याचा स्वतंत्र उल्लेख जरूर करावा. या परीक्षांना मार्गदर्शनाचे वर्ग नाहीत. तुमचे तुम्हीच शिकायचे ही यातील खरी गंमत आहे ! पुढील शिक्षणात या स्वयंअभ्यासाचा उपयोग होतो. ह्या परीक्षांमुळे तुमचा व्यवहारातील चौकसपणा वाढणार आणि पुढील इयत्तेत जे विज्ञान शिकणार आहात, ते समजण्यास तुम्हांला सुलभ जाणार याची आम्हांला खात्री आहे. सर्व निर्णयांबद्दल मराठी विज्ञान परिषदेचे मत अंतिम राहील.

**बँकेचा तपशील :**

Account Holder : Marathi Vidnyan Parishad    Bank Name : IDBI Bank

Branch : Chembur branch    Account no. : 66010010001451    IFSC: IBKL0000018

**Marathi Vidnyan Parishad**

Vidnyan Bhavan, V.N. Purav Marg, Sion-Chunabhatti (E), Mumbai 400022.

Whatsapp : 9969100961 Email : office@mavipa.org

**For More Information to visit our website: www.mavipa.org**

## Science Examination (English & Marathi Medium)

My Dear Students,

You have been using Science through Technology in your houses. Mobile smart phone, Laptop, Computer, Tablet, 3D Games, Smart Watch are just few examples, some you may have used. There will be a tremendous growth in next 15 to 20 year's time. We are unable to imagine. Time is changing so fast and technology is advancing, can you afford to have no liking for science at such a times? Are you ready to make friendship with science and that too, in an interesting manner? Yes, this is possible. Marathi Vidnyan Parishad is Conducting "Science Examinations through Post" since 2004 in English. These examinations are for standard 7, 8 and 9. Grownups can also appear to these examinations. These examinations are like Sanskrit, Drawing, Math's, Hindi that you usually appear. Being Science examination, this exam is little bit different.

These exams are for Primary 7th, Secondary for 8th and Final for 9th standard. To appear these exams, you have to pay fees and enroll your name till August end. Then we will send you a text book. There will be portion on Physics, Chemistry, Biology, Math's as usual. Science in daily life, problems in science, science stories, small experiments that you can do at your home, some project etc. will be there in addition to that.

Along with text book, we will supply you a question paper. Once you study the book, carry out science experiments and write the project, you can answer the question paper. While writing the answer book you can refer the text book. We have no objection to it. We will be happy that you have read the book. You carry out experiments. Inform us your observations and conclusions. Even if you fail in getting desired results, don't get nervous. Even Nobel laureates have failed many times. So don't feel shy to inform that you have failed. Carrying out experiments is very important for this exam. If you don't carry out experiments, then you will not achieve what you want to, by appearing to this examination. You will not get the certificate. If you do hands on exercise, there are chances, you will make mistake. If you make mistake, on analyzing that you will know where you have gone wrong. Then you can correct your mistake. If you do not undertake hands on activity, you will not make mistake and you will not get chance to go ahead or improve. We will send back your answer sheets with our remarks, so that you will understand, where and why you got less marks. One, who gets minimum 40% marks, will be declared successful. There are three prizes for all three examinations individually. These prizes are First Rs.1,000/-, Second Rs.800/- and third Rs.600/-. Prize money will be given 50% in cash, and books in 50%. Prizes will be given to students from that particular Standard. No prizes will be given to grownups.

**You will get books up to 31st August**

**Last date for receiving answer sheets 30th November**

**NB: Send only answer sheets don't send entire book.**

**Exam Fees :** Primary- Rs. 275/-, Secondary-Rs. 300/-, Final-Rs. 325/- Fees to be sent by money order or online payment . The necessary bank account are given for your convenience. Mumbai based students can pay by cash or by cheque. Our address is : Marathi Vidnyan Parishad, Vidnyan Bhavan, V. N. Purav Marg, Sion-Chunabhatti, Mumbai 400022. Mobile: 9969100961(Available between 10.30 a.m. and 5.30 p.m. except Tuesdays which is weekly holiday) Write your school and residential address (more preferred). There are no classes to these examination. You have to study yourself. This habit or practice of self study is going to help you in your higher education. There by you become confident. Marathi Vidnyan Parishad's decision will be final.

**Bank Details :**

Account Holder : Marathi Vidnyan Parishad

Branch : Chembur branch

Bank Name : IDBI Bank

Account no. : 66010010001451 IFSC: IBKL0000018